| MHKO160008112021 | नियमित दिवाणी दावा ११२/२०२१ मधील नि.क्र. ७१ खालील आदेश |
|---|---|

१. वादी यांनी प्रस्तुतचा अर्ज आणि सोबतचे प्रतिज्ञापत्र दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ आदेश २६ नियम ९ अन्वये कोर्ट कमिशनर यांची नेमणूक होवून मिळणेसाठी दाखल केला आहे.

२. वादींचे या अर्जामध्ये कथन आहे की, मौजे बांबवडे, ता. शाहुवाडी, जि. कोल्हापूर येथील गट क्रं. ४११, क्षेत्र हे. ०.६५.०० आर, पो. ख. ०.०५.०० आर, आकार रु. ०.९३ पैसे या शेतजमिनी पैकी वादीच्या मालकी कब्जा वहिवाटीचे क्षेत्र हे. ०.०२.२५ आर, आकार रु. ०.०३ पैसेची या मिळकतीचे झालेले खरेदीपत्र दुरुस्त होवून मिळणेकरीता, अज्ञार्थी हुकूम व कायम मनाईकरीता दाखल केलेला आहे. दावा मिळकतीत प्रतिवादी क्रं. २, ३ तसेच प्रतिवादी क्रं. ६ व ७ हे बेकायदेशीरपणे दावा मिळकतीमध्ये आर. सी. सी. बांधकाम करत आहेत. त्या इमारती पासून दक्षिण बाजूस किती जागा शिल्लक राहते व तिचे मोजमापे तसेच प्रतिवादी जे बांधकाम करत आहेत त्या इमारतीची व त्याचे मागील व पुढील रिकाम्या जागेची मोजमापे घेवून खरी वस्तुस्थिती रेकॉर्डवर येणेकरीता वादी यांनी कोर्ट कमिशनर यांची नियुक्ती व्हावी म्हणून विनंती वादी यांनी प्रस्तुत अर्जाद्वारे केली आहे.

२. प्रतिवादी यांनी प्रस्तुत अर्जास म्हणणे दाखल केलेले आहे. प्रतिवादी हे पुढे असे म्हणतात की, कोर्ट कमिशनर नेमणूकीचा अर्ज कायद्याने चालणेस पात्र नाही. निव्वळ वादी हे पुरावा गोळा करण्याच्या हेतूने सदरचा कोर्ट कमिशनर नेमणूकीचा अर्ज दाखल केला असलेने तो नामंजूर करणेत यावा अशी प्रतिवादीने विनंती केली आहे.

३. मी वादीं यांचे वादकथन, अभिलेखावरील कागदपत्रे यांचे अवलोकन केले आहे आणि वादी व प्रतिवादीं यांचे विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला आहे. वादीं यांनी

प्रस्तुतचा दावा आज्ञार्थी हुकूम होवून मिळणेकरीता व कायम मनाई ताकीदीकरीता वादीने दावा दाखल केला आहे. गट क्रं. ४११, क्षेत्र हे. ०.६५.०० आर, पो. ख. ०.०५.०० आर, आकार रु. ०.९३ पैसे या शेतजमिनी पैकी वादीच्या मालकी कब्जा वहिवाटीचे क्षेत्र हे. ०२.२५ आर, आकार रु. ०.०३ पैसेची या मिळकतीचे झालेले खरेदीपत्र दुरुस्त होवून मिळणेकरीता दाखल केलेला आहे. दावा मिळकतीत प्रतिवादी क्रं. २, ३ तसेच प्रतिवादी क्रं. ६ व ७ हे बेकायदेशीरपणे दावा मिळकतीमध्ये आर. सी. सी. बांधकाम करत आहेत त्यामूळे खरी वस्तुस्थिती रेकॉर्डवर येणेकरीता वादीने कोर्ट कमिशनर यांची नियुक्ती होवून मिळणेकरीता विनंती केलेली आहे. वादी यांचे वर नमूद वादकथनावरून प्रस्तुतचा दावा गुणदोषावर निकाली होण्यासाठी दावा मिळकतीत प्रतिवादी क्रं. २, ३ तसेच प्रतिवादी क्रं. ६ व ७ हे आर. सी. सी. बांधकाम करत आहेत किंवा नाहीत हा मुद्दा शाबित होणे अत्यंत आवश्यक आहे. सदर मुद्दयाकरीता तज्ञ व्यक्तीकडून दावा मिळकतीची कोर्ट कमिशनर म्हणून नियुक्ती होवून त्यांचा अहवाल अभिलेखावर येणे अत्यंत महत्वाचे आहे. सबब, दावा मिळकतीमधील सत्य परिस्थिती अभिलेखावर येण्यासाठी दावा मिळकतीची तज्ञ साक्षीदारांकडून मोजणी होणे अत्यंत आवश्यक आहे, त्यामुळे मी खालील आदेश करीत आहे.

## आदेश

१. अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. मा. उपअधिक्षक, भूमि अभिलेख, शाहुवाडी, ता. शाहुवाडी, जि. कोल्हापुर यांची कोर्ट कमिशनर म्हणून नेमणूक करण्यात येत आहे.

३. मा. कोर्ट कमिशनर यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी वादी आणि प्रतिवादी यांना पूर्व नोटीसा देवून, मौजे बांबवडे, ता. शाहुवाडी, जि. कोल्हापूर येथील गट क्रं. ४११, क्षेत्र हे. ०.६५.०० आर, पो. ख. ०.०५.०० आर, आकार रु. ०.९३ पैसे या शेतजमिनी पैकी वादीच्या मालकी कब्जा वहिवाटीचे क्षेत्र हे. ०.०२.२५ आर, आकार रु. ०.०३ पैसेची मिळकत या मिळकतीच्या उत्तर बाजूस प्रतिवादी क्रं. २, ३ तसेच प्रतिवादी क्रं. ६ व ७ यांनी अंदाजे पूर्व पश्चिम ४७ फुट व दक्षिण उत्तर

२२ फुट असे एकूण १०३४ चौ. फुटाचे चालू केलेले आर. सी. सी. बांधकाम तसेच रत्नागिरी रोड पासून दक्षिणेस गायरान मिळकतीपर्यत दावा मिळकतीच्या पूर्व बाजूने अंतर्गत येणे जाणेसाठी सोडलेला पूर्व पश्चिम १२ फुट रुंदीचा सोडलेला रस्ता यांची एकत्रात मोजणी करून त्याच्या हद्दी कायम करुन आणि दावा मिळकतीमध्ये अतिक्रमण आहे अथवा नाही असल्यास त्याची लांबी रुंदी व क्षेत्रफळ याचा स्पष्ट अहवाल नकाशामध्ये स्पष्टपणे नमूद करावे. तसेच दावा मिळकतीचे व अतिक्रमीत क्षेत्र असेल तर त्याची लांबी, रुंदी व क्षेत्रफळ स्पष्टपणे मोजणी अहवालात व नकाशात नमूद करावे.

४. वादी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी मा. कोर्ट कमिशनर यांची फि त्यांचे कार्यालयात जमा करावी.

५. वादी आणि प्रतिवादीं यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी मा. कोर्ट कमिशनर यांना कमिशन कामी आवश्यक ती मदत करावी.

६. येणेप्रमाणे कमिशन रिट अदा करण्यात यावेत.

दिनांक – १८/०४/२०२३
स्थळ- शाहूवाडी

( अमोल श्रीराम शिंदे)
दिवाणी न्यायाधीश, क. स्तर,
मलकापूर- शाहूवाडी, जि. कोल्हापुर

| MHKO160008112021 | नियमित दिवाणी दावा ११२/२०२१ मधील नि.क्र. ७२ खालील आदेश |
|---|---|

१. वादी यांनी प्रस्तुतचा अर्ज आणि सोबतचे प्रतिज्ञापत्र दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ आदेश ३९९ नियम ११ अन्वये प्रतिवादी क्रं. १ ते ६ यांचा बचाव (Defense strike out) करणेत यावा म्हणून दाखल केला आहे.

२. वादीने सदर अर्जामध्ये कथन आहे की, मौजे बांबवडे, ता. शाहुवाडी, जि. कोल्हापूर येथील गट क्रं. ४११, क्षेत्र हे. ०.६५.०० आर, पो. ख. ०.०५.०० आर, आकार रु. ०.९३ पैसे या शेतजमिनी पैकी वादीच्या मालकी कब्जा वहिवाटीचे क्षेत्र हे. ०.०२.२५ आर, आकार रु. ०.०३ पैसेची या मिळकतीचे झालेले खरेदीपत्र दुरुस्त होवून मिळणेकरीता दाखल केलेला आहे. दावा मिळकतीत प्रतिवादी क्रं. २, ३ तसेच प्रतिवादी क्रं. ६ व ७ यांनी बांधकाम करु नये तसेच दावा मिळकतीत येणे जाणेसाठी सोडलेला समाईक रस्ता प्रतिवादींनी बंद करु नये म्हणून कायम मनाईकरीता वादीने दावा दाखल केला आहे. सदरच्या दाव्यास प्रतिवादी यांनी नि. २४ ला कैफियत व म्हणणे दाखल केले आहे. सदर कामातील नि. ५ चा तुर्तातुर्त मनाई अर्ज गुण दोषावर चालून दि. १६/०२/२०२२ रोजी मंजूर होवून प्रतिवादी विरुध्द दावा मिळकतीमध्ये कोणतेही बांधकाम करु नये तसेच त्यामध्ये नि. ६३/१ वरील फोटोमध्ये असणारे बांधकामा व्यतिरीक्त बांधकाम करु नये याकरीता मा. कोर्टानी तुर्तातुर्त मनाई आदेश प्रतिवादी विरुध्द पारीत केलेला आहे.

३. वादी पुढे असेही म्हणतात की, यातील प्रतिवादी यांचे विरुध्द दावा मिळकतीत बांधकाम करु नये म्हणून दि. १६/११/२०२१ इा रोजी पासून जैसे थे चा हुकूम नि. ५ वरील आदेशापर्यंत कायम असताना देखील प्रतिवादी क्रं. २, ३ व ६ व ७ यांना मनाईचा आदेश असताना देखील प्रस्तुत प्रतिवादी यांनी बेकायदेशीरपणे व दांडगाव्याने

बांधकाम करु लागले आहेत. वादीने नि. ६३/१ मधील फोटो प्रमाणे आणखीण बांधकाम करुन ते पूर्ण केले आहे. त्यामूळे प्रतिवादी विरुध्द मनाई असताना देखील प्रतिवादीचे प्रवृत्तीला आळा घालणेकरीता व वादीला दावा मिळकतीस मुकावे लागणार आहे. अशा प्रकारे प्रतिवादीने मे. कोर्टाचे आदेशाचा आदर न करता भंग केलेला आहे त्यामूळे प्रतिवादीचा बचाव रद्द (Defense strike out) करणेची वादीने विनंती केली आहे.

२. प्रतिवादी यांनी प्रस्तुत अर्जास नि. ८२ म्हणणे दाखल केलेले आहे. प्रतिवादी हे पुढे असे म्हणतात की, वादीचा नि. ७२ चा अर्ज कायद्याने चालणेस पात्र नाही, त्यामूळे तो नामंजूर करणेत यावा. तसेच मूळ दाव्याची सुनावणी लांबवणेकरीता खोटया मजकूराचा अर्ज दाखल केला असलेने तो अर्ज नामंजूर करणेत यावा. तसेच प्रतिवादी यांनी कोणत्याही प्रकारे नि. ५ वरील आदेशाचा भंग केलेला नाही. सदर प्रतिवादी यांचे बाबत मे. कोर्टाचे मत कलुशित करण्याच्या हेतूने सदर कलमामध्ये वादीने कथन केले आहे. प्रतिवादीने मे. कोर्टाच्या आदेशाचा अवमान अगर भंग केलेला नाही. यातील वादी यांनी सदर प्रतिवादी यांना शारिरीक व मानसिक त्रास देण्याच्या हेतूने खोटा अर्ज दाखल केला असलेने वादीचा नि. ७२ चा अर्ज नामंजूर करणेची विनंती केली आहे.

३. मी वादी यांचे वादकथन, अभिलेखावरील कागदपत्रे यांचे अवलोकन केले आहे आणि वादी व प्रतिवादीं यांचे विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला आहे. वादीं यांनी प्रस्तुतचा दावा आज्ञार्थी हुकूम होवून मिळणेकरीता व कायम मनाई ताकीदीकरीता वादीने दावा दाखल केला आहे. गट क्रं. ४११, क्षेत्र हे. ०.६५.०० आर, पो. ख. ०.०५.०० आर, आकार रु. ०.९३ पैसे या शेतजमिनी पैकी वादीच्या मालकी कब्जा वहिवाटीचे क्षेत्र हे. ०२.२५ आर, आकार रु. ०.०३ पैसेची या मिळकतीचे झालेले खरेदीपत्र दुरुस्त होवून मिळणेकरीता दाखल केलेला आहे. दावा मिळकतीत प्रतिवादी क्रं. २, ३ तसेच प्रतिवादी क्रं. ६ व ७ हे बेकायदेशीरपणे दावा मिळकतीमध्ये आर. सी. सी. बांधकाम केले आहे. त्यामुळे मी खालील आदेश करीत आहे.

## आदेश

१. वादीचा नि. ७२ चा अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

दिनांक – १८/०४/२०२३

स्थळ- शाहूवाडी

( अमोल श्रीराम शिंदे)

दिवाणी न्यायाधीश, क. स्तर,

मलकापूर- शाहूवाडी, जि. कोल्हापुर